# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/11/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### विनयभंग

पो.स्टे. नरखेड :– दिनांक ०१/११/२०२३ चे ०८/३० वा. ते ०९/०० वा. दरम्यान फिर्यादी ही आपले शेतात कापुस वेचण्याकरीता एकटीच गेली होती शेतात पोहचुन कापुस वेचण्याकरीता ओटा बांधला व धुऱ्याच्या बाजुला फिर्यादी हि खाली बसली त्यावेळी शेताच्या शेजारी **आरोपी नामे– मुरलीधर युवनाते, रा. मोहगाव भदाडे ता. नरखेड** हा तिथे आला व त्याने एकटी पाहुन फिर्यादी हिला ओढताण केले व खाली पाडले त्यामुळे फिर्यादी ओरडली तेव्हा बाजुच्या शेतातील इसमाने त्यांचे शेतातल्या घरावर चढुन पाहिले ते पाहत आहे हे आरोपीला दिसले असता तो तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सारीका गुरूकर, पास्टे नरखेड मो. नं. ९६६५८३४९९९ या करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा माहुली येथे दिनांक ०७/११/२०२३ चे १९.३० वा. ते १९.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक तुळशिराम वत्ता, वय ५१ वर्ष, रा. माहुली ता. पारशिवनी व आरोपी नामे– पुरुषोत्तम महादेव वत्ता वय ५१ वर्ष रा. माहुली ता. पारशिवनी हे नातेवाईक असुन यातील फिर्यादी याने आरोपीस तु मला न विचारता कॅनलमधील पाणी माझा शेतातुन नाली खोदुन का नेले व इरीगेशन विभागाला तक्रार का दिली असे म्हटले असता आरोपी याने फिर्यादीस मी माझा शेताला पाणी वलीन तुझाशी जे बनते ते करुन घे असे म्हणुन झगडाभांडण करुन शिवीगाळ केली व बाजुला उभी असलेली बैलबंडीची लाकडी उभारी काढुन डाव्या खांदयावर व डाव्या डोळयाचा खाली मारुन जखमी केले व तु शेतात ये तुला पाहुन घेईन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन पारशिवनी येथे आरोपीविरुध्द ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार साहेबराव मसराम मो. नं ९४२२४४७०४५ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मांढळ येथे फिर्यादी नामे— विवेक कृष्णाजी सुखदेवे, वय ३८ वर्ष, रा. वग त. कुही जि. नागपूर हा दिनांक ०७/११/२३ रोजी नेहमी प्रमाणे सकाळी आपली मोटरसायकल क्र. एम. एच.— ४०/झेड— ७६९१ ही घेवुन शेतात गेले असता शेतीचे कामे आटपवुन ०४/३० वा. घरी आले व मांढळ येथील आठवडी बाजार करण्याकरीता फिर्यादी सोबत श्रीराम कामठे रा. वग याला सोबत घेवुन मांढळ येथे अंदाजे ०५.०० वा. दरम्यान येवुन पिएचसी मांढळ येथील पिएचसीच्या आतमध्ये फिर्यादीची मोटारसायकल क्रं. एम. एच.— ४०/ झेड ७६९१ लावुन हॅन्डेल लॉक करुन चावी सोबत घेवुन बाजार करण्याकरीता गेले व बाजार करुन फिर्यादी व त्याचे सोबत असलेला कामठे अंदाजे ०५.३० वा. दरम्यान पिएचसी मध्ये ठेवलेली फिर्यादीची मोटरसायकलकडे आले असता मोटारसायकल दिसुन आली नाही म्हणुन फिर्यादीने तिचा आजुबाजुला विचारपुस करुन तिचा शोध घेतला असता मोटारसायकल क्र. एम. एच.— ४०/झेड ७६९१ ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सुधिर पोस्टे कुही मो. नं. ८६९८४०७११४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**